रयत शिक्षण संस्थेचे,

अण्णासाहेब आवटे आर्ट्स, कॉमर्स & हुतात्मा बाबू गेणू सायन्स कॉलेज, मंचर

ता. आंबेगाव जि. पुणे

मराठी विभाग,

कवयित्री शांता शेळके प्रतिष्ठान व महाराष्ट्र साहित्य परिषद मंचर ,

यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित

* श्रावणशिरवा काव्यसंमेलन *

अहवाल

आपल्या महाविद्यालयातील मराठी विभाग व महाराष्ट्र साहित्य परिषद, शाखा-मंचर, कवयित्री शांता शेळके प्रतिष्ठान, मंचर यांच्या संयुक्त विद्यमाने पावसाळ्यानिमित्त श्रावणशिरवा काव्यसंमेलन' या काव्यसंमेलनाचे दिनांक १४/०८/२०२५ गुरुवार रोजी आयोजन करण्यात आले होते. सदर कार्यक्रमास महाराष्ट्रातील वेगवेगळ्या नाशिक, राजगुरूनगर, पिंपरी-चिंचवड, बारामती, तळेगाव, संगमनेर अशा विविध ठिकाणाहून सुमारे जवळपास ५० कवी सहभागी झाले होते. त्याचबरोबर या काव्यसंमेलनात महाविद्यालयातील विद्यार्थ्यांनीही उत्स्फूर्तपणे सहभाग नोंदवून आपल्या स्वरचित कविता सादर केल्या.

सदर काव्यसंमेलनाचे प्रमुख पाहुणे महाविद्यालयाचे मा. प्राचार्य डॉ. एन. एस. गायकवाड, मा. विठ्ठल महामुनी होते. तर या संमेलनास महाराष्ट्र साहित्य परिषद, मंचर शाखेचे अध्यक्ष मा. दत्ताजी पायमोडे महाराष्ट्र साहित्य परिषद, खेड शाखेचे अध्यक्ष मा. संतोष गाढवे तसेच, तसेच महाविद्यालयाचे विभागप्रमुख डॉ.बी.पी.गार्डी, प्रा.मुंढे जी.डी. प्रा.केंगले ए.के. प्रा. झावरे सी. ए. हे उपस्थित होते. सदर काव्यसंमेलनाचे प्रास्ताविक व पाहुण्यांचे स्वागत मराठी विभागाचे विभागप्रमुख प्रो. डॉ. बी.पी. गार्डी यांनी केले. या प्रस्तावनेत त्यांनी या कार्यक्रमाचे आयोजन करण्यामागचा हेतू स्पष्ट करून श्रावणशिरवा या शांता शेळके यांच्या कविता संग्रहावरती प्रकाश टाकून निसर्गाची मानवी जीवनातील महत्त्वाची भूमिका स्पष्ट केली. तर इतर मान्यवरांनी तसेच या काव्यसंमेलनास आवर्जून उपस्थित असलेल्या सर्व कवींनी निसर्ग, पर्यावरण, झाड, पाऊस, श्रावण महिना, पर्यावरण व त्याचे महत्त्व अशा विविध विषयांवरती स्वरचित कविता आपल्या खास अशा शैलीत सादर केल्या. या प्रसंगी मा. दत्ताजी पायमोडे, मा. संतोष गाढवे, मा. विठ्ठल महामुनी यांनी पर्यावरण आणि पर्यावरण जागृती संबंधीचे आपले विचार व्यक्त केले. प्रस्तुत कार्यक्रमास उपस्थित असणाऱ्या सर्व मान्यवरांचे, पाहुण्यांचे, आयोजकांचे व सहभागी कवींचे आभार मा. दत्ताजी पायमोडे यांनी मानले. तर कार्यक्रमाचे सूत्रसंचालन मा. संतोष गाढवे यांनी केले.









मान्यवर कवी आपल्या कवितेचे वाचन करताना





प्रमुख पाहुणे व मान्यवर कवी कर्मवीर भाऊरव पाटील यांच्या प्रतिमेचे पूजन करताना









कवी व विद्यार्थींचा सत्कार करताना





उपस्थित मान्यवर कवी व उपस्थित विद्यार्थी